# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०९/०९/२०१६

**१) विश्वासघात करून मॅगनीजची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २९/०८/२०१६ ते ०१/०९/२०१६ पर्यन्त यातील आरोपी क्र. १ ते ४ यांनी व आरोपी क्र. ५ ते ६ यांचेशी संगनमत करून आयडीएल मार्क्स (मसरर्स) प्रा. लि. चे मालक वाहतुकी दरम्यान एकुण २,६०,०००/–रू. च्या किमतीच्या मॅगनीजची अफरातफर करून अन्यायाने विश्वासघात केल्याने पो. स्टे. हजीरा. जि. सुरत (गुजरात) यांची ००/१६ कलम ४०७, ११४ भांदवि. चे कागदपत्र आणुन पेश केल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चांदेवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४०७, ११४ भांदवि. अन्वये नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी २३.३०वा. ते २४.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपल्या परिवारासह घरी झोपला असता यातील आरोपी हा फिर्यादीचे घराचे अंगणात जावुन काठीने दार ठोकुन शिविगाळ करून मारण्या पिटण्याची धमकी देवुन व जेसीपीचे समोरील काच फोडुन अंदाजे १५,०००/–रू. चे नुकसान केल्याने फिर्यादी रामचंद्र पाडुरंग चकोले वय ६२ वर्ष, रा. सावरी/मुरमाडी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४७,४२७,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३)अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेली . :–**

दिनांक ०८/०९/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही कोणाला काही न सांगता घरून निघुन गेली व आता पर्यन्त घरी परत न आल्याने ती बेपत्ता आहे. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व मा. सर्वोच्च न्यायालयाचे अल्पवयीन मुले हरविल्यास गुन्हा नोंद करण्याचे आदेश असल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणा वरून मारहाण करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक ०८/०९/२०१६ रोजी १३.३० वा. ते १४.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आरोपीच्या घरी लोहा कापण्याची मशिन ठेवण्या करीता गेला असता यातील आरोपीने माझ्या घरी कश्यासाठी आला होता म्हणुन मारपीट करून डोक्यावर काचेची बॉटल मारून जखमी करून शिविगाळ केली व जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने असे फिर्यादी शिवशंकर नारायन शेंडे वय ३१ वर्ष, रा. पारडी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

५)<u>अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी</u> . :–

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, मोहाडी, कारधा, तुमसर, साकोली, अडयाळ व लाखांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८४ लिटर हातभट्टी दारू कि. ५,८३०/–रू. व ३ लिटर २४० मिली देशी दारू कि. ९००/–रू. तसेच जुगारातुन १२,७०८/–रू. असा एकुण १९,४३८/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.